Vol 1 Issue 8 Feb 2012 ISSN No :2231-5063

International Multidisciplinary Research Journal

Golden Research Thoughts

Chief Editor
Dr.Tukaram Narayan Shinde

Publisher
Mrs.Laxmi Ashok Yakkaldevi

Associate Editor
Dr.Rajani Dalvi

Honorary
Mr.Ashok Yakkaldevi

Welcome to GRT

RNI MAHMUL/2011/38595 **ISSN No.2231-5063**

Golden Research Thoughts Journal is a multidisciplinary research journal, published monthly in English, Hindi & Marathi Language. All research papers submitted to the journal will be double - blind peer reviewed referred by members of the editorial board.Readers will include investigator in universities, research institutes government and industry with research interest in the general subjects.

International Advisory Board

Flávio de São Pedro Filho
Federal University of Rondonia, Brazil

Kamani Perera
Regional Center For Strategic Studies, Sri Lanka

Janaki Sinnasamy
Librarian, University of Malaya

Romona Mihaila
Spiru Haret University, Romania

Delia Serbescu
Spiru Haret University, Bucharest, Romania

Anurag Misra
DBS College, Kanpur

Titus PopPhD, Partium Christian University, Oradea,Romania

Mohammad Hailat
Dept. of Mathematical Sciences, University of South Carolina Aiken

Abdullah Sabbagh
Engineering Studies, Sydney

Ecaterina Patrascu
Spiru Haret University, Bucharest

Loredana Bosca
Spiru Haret University, Romania

Fabricio Moraes de Almeida
Federal University of Rondonia, Brazil

George - Calin SERITAN
Faculty of Philosophy and Socio-Political Sciences Al. I. Cuza University, Iasi

Hasan Baktir
English Language and Literature Department, Kayseri

Ghayoor Abbas Chotana
Dept of Chemistry, Lahore University of Management Sciences[PK]

Anna Maria Constantinovici
AL. I. Cuza University, Romania

Ilie Pintea,
Spiru Haret University, Romania

Xiaohua Yang
PhD, USA

.....More

Editorial Board

Pratap Vyamktrao Naikwade
ASP College Devrukh,Ratnagiri,MS India

R. R. Patil
Head Geology Department Solapur University,Solapur

Rama Bhosale
Prin. and Jt. Director Higher Education, Panvel

Salve R. N.
Department of Sociology, Shivaji University,Kolhapur

Govind P. Shinde
Bharati Vidyapeeth School of Distance Education Center, Navi Mumbai

Chakane Sanjay Dnyaneshwar
Arts, Science & Commerce College, Indapur, Pune

Awadhesh Kumar Shirotriya
Secretary,Play India Play,Meerut(U.P.)

Iresh Swami
Ex - VC. Solapur University, Solapur

N.S. Dhaygude
Ex. Prin. Dayanand College, Solapur

Narendra Kadu
Jt. Director Higher Education, Pune

K. M. Bhandarkar
Praful Patel College of Education, Gondia

Sonal Singh
Vikram University, Ujjain

G. P. Patankar
S. D. M. Degree College, Honavar, Karnataka

Maj. S. Bakhtiar Choudhary
Director,Hyderabad AP India.

S.Parvathi Devi
Ph.D.-University of Allahabad

Sonal Singh,
Vikram University, Ujjain

Rajendra Shendge
Director, B.C.U.D. Solapur University, Solapur

R. R. Yalikar
Director Managment Institute, Solapur

Umesh Rajderkar
Head Humanities & Social Science YCMOU,Nashik

S. R. Pandya
Head Education Dept. Mumbai University, Mumbai

Alka Darshan Shrivastava
Shaskiya Snatkottar Mahavidyalaya, Dhar

Rahul Shriram Sudke
Devi Ahilya Vishwavidyalaya, Indore

S.KANNAN
Annamalai University,TN

Satish Kumar Kalhotra
Maulana Azad National Urdu University

Address:-Ashok Yakkaldevi 258/34, Raviwar Peth, Solapur - 413 005 Maharashtra, India
Cell : 9595 359 435, Ph No: 02172372010 Email: ayisrj@yahoo.in Website: www.aygrt.isrj.net

ISSN No-2231-5063 Vol.1,Issue.VIII/Feb 2012pp.1-4

Research Paper

१९७५ नंतरची मराठी ग्रामीण कथा

आशालता नारायण खोत
मराठी विभाग, देवचंद महाविद्यालय, अर्जुननगर.
ता. कागल.जि. कोल्हापूर

सारांश

कथा हा प्रकार अत्यंत प्राथमिक व स्वाभाविक आहे. तो सर्व वाङ्मय प्रकारांना व्यापून उरणारा आहे. कोणत्याही भाषेतील कथा त्या-त्या संस्कृतीचे प्रतीक ठरतात. कथा निर्मितीच्या दोन प्रेरणा असतात.

१)प्रत्येक कथा लेखकाला काहीतरी व्यक्त करायचे असते.
२)मानवी जीवनाबद्दलच्या जिज्ञासेतून तो लिहित असतो.

प्रस्तावना

डॉ. नागनाथ कोत्तापल्ले यांच्या मते लीळाचरित्रातील दृष्टांत कथांमधून सिध्द झालेला 'दृष्टांतपाठ' हा मराठीतील जुन्यात जुना लिखित कथासंग्रह होय. डॉ. आनंद यादवांच्या मते ग्रामीणांचे साहित्य हे लोकसंस्कृतीचे साहित्य होय. आधुनिक साहित्य हे साक्षर लोकांच्या वाचनासाठी होते. ग्रामीण साहित्याच्या चळवळीचे प्रवर्तक ज्या शेतकरी-बहुजनांच्या व्यथा-वेदनांची अपेक्षा करतात, तो वर्ग बहुतांशी निरक्षर होता.

ग्रामीण जनजीवनाचे ग्रामीण संवेदनशीलतेने केलेले चित्रण ज्या साहित्यात असते ते ग्रामीण साहित्य होय. यातील ग्रामीण हे विशेषण खेड, कृषीजीवन, शेतीशी निगडीत व्यवसाय, खेड्यातील जनजीवनाचे कष्ट, हर्ष, दु:ख, दारिद्रय, रुढी, परंपरा, संस्कृती या साऱ्यांचा निर्देश करते. ग्रामीण जीवनाचे दर्शन ह.ना. आपट्यांच्या 'काळ तर मोठा कठिण आला' या कथेपासून दाखविता येते. पण असे अपवाद वगळता १९२० नंतरच मराठी साहित्यात खेड्याचे चित्रण अधिक येऊ लागले. १९४५-५० नंतर माडगूळकर, पाटील, मिरासदार, इ. लेखकांनी या साहित्यात कलात्मकता आणली.

१९७७ च्या आसपास ग्रामीण साहित्याची चळवळ उद्भवली. ग्रामीण हे केवळ प्रदेशसूचक भौगोलिक वैशिष्ट्य आहे. वास्तववाद या प्रेरणेचा एक अविष्कार अशी भूमिका प्रारंभी घेतली गेली. पण केवळ वास्तववाद ही ग्रामीण कथेची प्रेरणा नाही हे आता सर्वमान्य झाले आहे. १९७० नंतरची ग्रामीण कथा अभ्यासल्यानंतर त्यांचे वेगळेपण स्पष्ट होईल, असा विश्वास वाटतो.

विषय विवेचन

१९७७ च्या आसपास ग्रामीण साहित्याची चळवळ उद्भवली ग्रामीण हे केवळ प्रदेशसूचक भौगोलिक वैशिष्ट्य आहे. वास्तववाद या प्रेरणेचा अविष्कार अशी भूमिका प्रारंभी घेतली गेली. पण केवळ वास्तववाद ही ग्रामीण कथेची प्रेरणा नाही हे आता सर्वमान्य झाले आहे. व्यंकटेश माडगूळकरांच्या कथामध्ये निर्लेप वस्तुनिष्ठा दिसते; पण ग्रामीणत्वाच्या संकल्पनेचा स्पर्श कमी जाणवतो. त्याबद्दल चंद्रकांत बांदिवडेकर म्हणतात, ''माडगूळकरांची कथा प्रामाणिक अनुभवांच्या बाबतीत शंभर नंबरी सोने, मात्र त्या कथातील अनुभवाचे मूल्यमापन केले तर तितके मुक्तपणे बोलणे कठिण होईल.

शंकर पाटील ग्रामीण मनाच्या अंतरंगाचे चित्रण निसर्गाच्या साथीने करताना दिसतात. येथे वास्तववाद नागरशैलीच्या आधाराने प्रकटतो असे वाटते, जातीयता व बदलत्या मूल्यसंघर्षामुळे ग्रामीण जीवन कसे अमानवी होते, याचे वास्तव तरीही मूल्यनिष्ठ चित्रण शंकरराव खरात, आनंद यादव हे लेखक करतात. उद्धव शेळक्यांच्या कथा वऱ्हाडी माणसांच्या राहत नाहीत. बदलत्या ग्रामजीवनात उपेक्षित व दरिद्री माणसांच्या त्या कथा होतात. सामान्य माणसांच्या जीवनातील नाट्य साध्या, वर्णनात्मक पध्दतीने चित्रित करतात. सामाजिक-सांस्कृतिक पर्यावरणात त्यांच्या वेदनांची कारणे शोधावयास भाग पाडतात. बाह्य वास्तवाबरोबरच जीवनमूल्यांचा ऱ्हास, जीवनकलहाचे बदलते स्वरुप, अनुभवाची मौलिकता यामुळे करुणेची आर्द्रता वस्तुनिष्ठ शैलीतून प्रकटते.

द.मा. मिरासदारांच्या कथेमधून विनोदाला प्राधान्य दिले गेले. त्यामुळे ग्रामीण कथांच्या कथाकथनाला प्रतिसाद मिळत होता. रुपवादी समीक्षा व विनोदी शैली यामुळे १९७५ च्या सुमारास ग्रामीण कथा म्हणजे विनोद, तपशीलवार वर्णने, गोष्टीवेल्हाळपणा असे स्वरुप तिला आले, असे डॉ. आनंद यादव यांना वाटते. शुध्द वास्तववादी लेखक रुपवादाकडे किंवा कलावादाकडे झुकल्याचे जाणवते. ग्रामीण व्यवस्थेतील नवश्रीमंत शेतकरी व नवसाक्षर बहुजन हे देशांतर्गत वसाहतवादाची स्वत:च कशी साधने झाली व ग्रामीण शेतकऱ्यांच्या शोषणाला कशी कारणीभून ठरली याचे सविस्तर विवेचन अलिकडे प्रा. भास्कर चंदनशिव यांनी 'ग्रामीण वाङ्मयाचा इतिहास' या पुस्तकात केले आहे.

मराठी समीक्षेत ग्रामीण आणि प्रादेशिकता याबाबत काही लोकांच्यात गोंधळ दिसतो. प्रादेशिकतेमध्ये त्या - त्या प्रदेशातील लोकजीवन असा अर्थ अभिप्रेत असतो. ग्रामजीवनात 'ग्रामीणता' ही एक व्यवस्था केंद्रस्थानी असते तशी प्रादेशिकतेमध्ये नाही. श्री. ना. पेंडसे यांच्या कादंबऱ्या प्रादेशिक आहेत, त्यात ग्रामीणता येत नाही. ग्रामव्यवस्थेचा केंद्रबिंदू शेतकरी आहे. खेड्यातील इतर बलुतेदार हे या केंद्राच्या परिघात येतात असे मानले तर ग्रामीण साहित्य हे एका अर्थी शेतकरी साहित्यच ठरते. त्यामुळेच शेतकऱ्यांची भाषा, जीवनशैली, त्यांचा जीवनसंघर्ष आणि त्यांचे आस्तित्व मुखारित करणारे संपूर्ण ग्रामजीवन रेखाटले. नव्या पिढीच्या ग्रामीण कथेच्या संदर्भात शेतकरी जीवन केंद्रस्थानी कसे आहे हे 'अनंत भोयर' या कथेतून स्पष्ट होते. ग्रामीण कथेची सर्व मूल्ये या कथेतून चित्रित होतात. स्थानिक भाषा, मनुष्यस्वभाव आणि स्थानिक समस्या या कथाकारांने चित्रित केलेल्या दिसतात. या कथेत माडगूळकरी तटस्थ वास्तवता, शंकर पाटलांचा मनस्वीपणा, उध्दव शेळक्यांची शैली आणि डॉ. आनंद यादवांची गहनता या गोष्टी दिसतात. त्याचबरोबर ग्रामीण साहित्य म्हणजे शेतकरी साहित्यच कसे आहे हेही पटते.

ग्रामीण पिढीच्या तिसऱ्या पिढीतील लेखकांनी कथातून जे जीवनानुभव प्रकट केलेले आहेत ते प्रांजळ आहेत; त्यात उत्कटता व तळमळ आहे. आजच्या जीवनातील बदलत्या परिस्थितीचे, त्यातील ताण-तणावाचे, गुंतागुंतीचे भानही या तरुण लेखकांना काही प्रमाणात आलेले दिसते; पण या अनुभव कथनात तेवढी तीव्रता, तीक्ष्णता किंवा कलात्मक साभिप्रायता नाही. जीवन वास्तवाचे आकलनही अपुरे वाटते. याबद्दलचे मत खुद्द आनंद यादवांनी आपल्या प्रस्तावनेत नमूद केले आहे.

कथेतील आत्मकथन म्हणजे केवळ स्वानुभवांचे ढोबख निवेदन नव्हे तर

Please cite this Article as : *आशालता नारायण खोत*, *१९७५ नंतरची मराठी ग्रामीण कथा* :
Golden Research Thoughts (Feb ; 2012)

त्या निमित्ताने जीवनानुभवांकडे त्यातील गुंतागुंतीकडे तटस्थपणे पाहणे; आत्मभावांच्या द्वारा जीवनाचे विविध भाव अनुभवणे असते. पूर्वकालीन ग्रामीण जीवनाचे पांढरपेशी स्वप्नाळू दृष्टिकोनातून दर्शन घडत राहिल्यामुळे काही काळ स्वानुभूत ठणठणीत आत्मकथनाचे काही काळ कौतुक झाले, पण यामुळेच त्याचा एक ढाचा बनला. अज्ञान, दारिद्र्य किंवा गावकुसातील लोकांच्या लांड्यालबाड्या, लफडी यांच्यावरच ठराविक पध्दतीचा भर राहिला. ग्रामीण कथेत नव्या-जुन्या जीवनातील विविध संदर्भाची काही स्पंदने आढळतात; पण त्यांना चिंतनशीलतेची आवश्यक ती जोड मिळालेली नसल्यामुळे ती प्रसरणशील होत नाहीत.

आजच्या ग्रामीण कथेतील वास्तव फार ढोबळ किंवा सांकेतिक असते. दारिद्र्याच्या आणि अज्ञानाच्या पोटी दडलेली अर्थ आणि अनर्थ, त्यातून उद्‌भवणाऱ्या अनेक वेदना आणि निग्रह यांना समर्थपणे अद्यापि फारसा कोणी हात लावलेला नाही. दुसरे असे की आजच्या ग्रामीण साहित्यातील ग्रामीण जीवनाचे दर्शन आजचे वाटण्यापेक्षा कालचेच वाटते. एकेकाळचे पारंपारिक सनातन खेडे आता बदलू लागले आहे. त्यात अनेक प्रकारची उलघाल होत आहे. या स्थित्यंतराचा, औद्योगिकीकरणाचा, शहरी संपर्काचा, ग्राम जीवनावर होणारा भला-बुरा परिणाम, खेड्याच्या आसपास प्रस्थापित होऊ लागलेली कारखानदारी, त्यातून उद्‌भवणारे नवे ताण-तणाव, जुन्या-नव्या कुटुंबव्यवस्थेची सरमिसळ, नवे राजकीय पुढारीपण, नव्या ग्रामसंस्था असे आणखी किती तरी आज ग्रामीण लेखकांच्या स्पर्शासाठी आसुसलेले आहे. तिसऱ्या पिढीतील ग्रामीण कथाकारांत चारुता सागर आणि महादेव मोरे हे दोघे दोन वेगवेगळ्या प्रवृत्तींचे प्रतिनिधी ठरतात. चारुता सागर यांच्या कथेत शंकर पाटील यांच्या कथेतील नाट्यात्म बीज व मनोविश्लेषण आणि यादवांच्या कथेतील काव्यगर्भता यांचे सुंदर मिश्रण झाले आहे. 'नागीण' या कथेतून त्यांच्या लेखन सामर्थ्याचा प्रत्यय येतो. छोट्या-छोट्या वाक्यातून घटनेतील वेग आणि नाट्य पकडण्याचे सामर्थ्य कुसुमाग्रजांच्या 'अहि-नकुल' कवितेच्या भाषेची आठवण करुन देते. वेगवान घटना आणि त्याला बिलगून आलेले चंद्राचे मनोविश्लेषण यांचा मेळ कथेत सुंदर रितीने घातला जातो.

'दर्शन' या कथेची रचना याच पध्दतीची आहे. जोगतिणीचे जिणे जगणाऱ्या पुतळ्याच्या आयुष्याची परवड चारुता सागर एकीकडे पुतळ्याचे मनोविश्लेषणअ, तर दुसरीकडे वेगाने घडत जाणाऱ्या घटना यांच्या आधारे मांडतात. डोंबारी, नंदीवाले, गारुडी यांच्या जगण्याचे दर्शन कथेतून घडते. ग्रामीण कथेच्या परीघाबाहेर राहिलेले जग महादेव मोऱ्यांनी चित्रित केले. मोटार ड्रायव्हर, क्लीनर, मेस्त्री वेशीर, मेहतर समाज, वेश्या, जोगतिनी, डोंबारी-कोल्हाटी यांचे जगणे आणि दु:ख इ. विषय चित्रित केले. मूलत:च असणाऱ्या सनसनाटी आणि नाट्यपूर्ण अनुभवांची मांडणी अति भडक आणि नाट्याच्या स्वरुपात केली.

फडके संप्रदायातील रंजक लोकप्रिय कथेचा साचा होय ग. ल. ठोकळानी ग्रामिण कथेत आणला.भास्कर चंदनशिव यांच्या कथेत वेगवेगळ्या नमुन्याची पात्रे वावरताना दिसतात. माडगुळकर, मिरासदारांच्यानंतर माणसांचे इतके नानाविध नमुने चंदनशिवांच्या कथेत दिसतात. सरपंच, पाटील, जमिनदार, शेतमजुर, अन्यायाला बळी पडणाऱ्या स्त्रिया अशा वेगवेगळ्या स्तरातील माणसे दिसतात. ग्रामिण भाषा आणि प्रतिमा वापरुन पात्रांच्या मनात खोलवर उतरतात. रंघनाथ पठारे यांनी आपल्या लेखनातुन बदललेली खेडी, शहरी मानसिकता आत्मसात करु बघनारी तरी मुळातील ग्रामिण जीवनव्यवहारांपासुन दुर होउ न शकणारी तालुकेवजा गाव यांचे चित्रण केलेले दिसते.

तिसऱ्या पिढितील कथांकारांपेक्षा वेगळी असणारी,अनुभुतीतील ताजेपणा आणि अभिव्यक्तितील चैतन्य यामुळे चौथ्या पिढीची कथा लक्षवेधी ठरली. ग्रामिण कथेला एक पाउल पुढे नेण्याचे काम कांही स्त्री कथाकारांनी केले. त्यातीलच एक प्रतिमा इंगोले या होत. त्यांच्या कथा वास्तववादी आहेत. दु:ख हे केंद्रबिदु आहे. विलक्षण नाट्य वऱ्हाडी बोलीच्या ठसकेदार वापरामुळे,प्रादेशिक म्हणी आणी वाकप्रचारमुळे अधिक खुलते. अकारण येणारी निसर्गवर्णने किंवा भौगौलीक वर्णने यांच्या कथेत अजिबात येत नाहीत. उदा.माळ,झाड, झुडुप, इ. कथा श्री. म. माटेंच्या कथेप्रमाणे त्यांच्या कथेला प्रबोधनाचे अंग आहे.जीवनाचा समग्रतेने विचार करुन ग्रामिण जीवनातील दु:खाची कारणे समाजव्यवस्थेत शोधण्याचा प्रयत्न करतात. कथेतील व्यक्तीरेखा ठसठशीत असतात उदा. भोंड कथेतील गोकुर्या, परायाची लेक मधील केसर इ. समाजव्यवस्थेच्या समग्र भानामुळे त्यांच्या कथेतील आशय वजनदार होतो.

चौथ्या पिढीच्या ग्रामीण लेखकांमध्ये बाबाराव मुसळे आणि सदानंद देशमुख या दोघांचे कथालेखनही लक्ष वेधून घेणारे आहे. ग्राम जीवनातील वैयक्तिक आणि सामाजिक पातळीवरील दु:ख मुसळे ताकदीने व्यक्त करतात. उदा. मोहोरलेला चंद्र, भुजंग इ. माणसातील सुष्ट-दुष्ट प्रवृत्तींच्या झगड्याचे वर्णन त्यांच्या कथेतून दिसते. 'इंधं' या कथेत अतिशय सामर्थ्यशाली दर्शन घडते. ही कथा म्हणजे ग्रामीण कथेच्या विकासातील महत्वाचा टप्पा ठरते. सामर्थ्यवान कथाबीज, सुटसुटीत आणि एकात्म बांधणी प्रवाही निवेदन व ठसकेबाज संवाद हे त्यांच्या कथलेखनाचे विशेष होत.

सदानंद देशमुखांची कथा सरळ, साधेपणाने, साध्या घटना आणि प्रसंग उलगडत जाते. जीवनाच्या संमिश्रतेचे भान कथेतून दिसते. उदा. 'अंधारबन' हा पहिला कथासंग्रह त्यात विषयाची विविधता दिसते. ग्रामीण जीवनातील समस्यांचे भान निश्चितच असते. बंदिस्त कुटुंबव्यवस्था आणि ग्रामजीवनातील अभावग्रस्ततेमुळे स्त्रीचे दु:ख अधिकच गहिरे होते. 'आसवाचं आभाळ', मरणवाट' या कथेतून उत्कटता यामुळे त्यांच्या सर्वच कथा काव्यात्म बनतात. निवेदनासाठी प्रमाणभाषा आणि संवादांसाठी ग्रामीण बोली यांची सुरेख लय साधलेली दिसते. जीवन जसे आहे तसे त्यातील वास्तव ताणे-बाणे लक्षात घेऊन कथेत दाखविले जाते. राजन खान यांनी आपल्या लेखनातून ग्रामीण परिसरातील मुसलमान जीवनाचे चित्रण केले आहे. ग्रामीण स्थित्यंतरातील बऱ्याचशा भावनिक, वैचारिक बाजूंना तिसऱ्या व चौथ्या पिढीतील ग्रामीण कथा स्पर्श करीत आहे. असे करताना आविष्कराच्या संपन्न आणि वैविध्यपूर्ण वाटाही ती शोधत आहे.

गेल्या पन्नास वर्षाची ग्रामीण कथेची वाटचाल बघितली तर ती निश्चितच विकासाच्या दिशेने चाललेली दिसत आहे. तात्कालिक मोहांना बळी पडून प्रचारकी किंवा अतिरेकी होण्याचे तिने टाळले.

समकालीन ग्रामीण वास्तवातील अन्य प्रश्नांना थेटपणे सामोरे जात आजची ग्रामीण कथा आविष्कराची संपन्नता दाखवत आहे. जे विषय ग्रामीण कथांमध्ये मावू शकले नाहीत. त्यांच्यावर कादंबरीलेखन करुन ग्रामीण लेखकांनी ग्रामीण परिसर त्यातील बारकाव्यांसह वाचकांसमोर आणले. मराठी कथेच्या मुख्य प्रवाहात दोन-तीन दशके टिकून राहिलेले आणि आशय अनुभूतीचे नवे-नवे आकार शोधत, स्वत:चे जुने वळण बदलत दर्जेदार कथा देत राहिलेले कथाकार बरेच दिसतात. नव्या दमाच्या ग्रामीण कथाकारांनी याचे भान ठेवले तर हजारो वर्षांची परंपरा पाठीशी घेऊन आधुनिकीकरणाच्या वळणावर येऊन उभा राहिलेला महाराष्ट्रासारखा प्रदेश ग्रामीण कथाकारांना यापुढेही सतत सकस कथाबीजे पुरवत राहील.

आजच्या ग्रामीण कथेतील वास्तव एकंदरीत ढोबळ किंवा सांकेतिक असते. खेडे गावातील व्यक्तीचे दारिद्र्य आणि अज्ञान हे नेहमीचेच चित्रणविषय ठराविक पध्दतीने येथे चित्रित होते. आजच्या ग्रामीण साहित्यातील ग्रामीण जीवनाचे दर्शन आजचे वाटप्यापेक्षा कालचेच वाटते. एकेकाळचे पारंपारिक सनातन खेडे आता बदलू लागले आहे. त्यात अनेक प्रकारची उलघाल होत आहे. त्याचे चित्रण आजच्या ग्रामीण कथेतून झालेली दिसते.

चौथ्या पिढीतील बाबुराव मुसळे ग्रामजीवनातील अंधश्रध्दा उत्तम रितीने रेखाटतात. उदा. इंधं ही कथा ज्यातून पायाळू माणसाच्या अंगावर पावसाळ्यात वीज पडते ही अंधश्रध्दा उत्तम रितीने मांडली त्यांच्या हार-जीत, निंदण, चौघड्या, घमड्या या कथा उल्लेखनीय वाटतात. सदानंद देशमुख हे आसवाचं आभाळ, मरणवाट, उलंगवाडी यासारख्या कथेतून स्त्री-दु:ख रेखाटतात.

देवदासी चळवळीत सक्रिय असलेल्या राजन गवस यांनी देवदासींच्या व्यथावरींल कथा लिहून चौथी पिढी सक्षम केली.

निष्कर्ष :

शिक्षण, वाचन, प्रबोधन, शहरांशी असलेला संपक्र, अर्थोत्पादनाची बदललेली साधने, व्यापार, दूरदर्शनचे होणारे परिणाम यामुळे ग्रामीण परिसरातील माणसांचे दृष्टिकोन बदलत चालले आहेत. ग्रामीण परिसराचा, तेथील जातीयतेचा पुढाऱ्यांनी स्वत:च्या राजकारणासाठी वापर केल्यामुळे नवे प्रश्न निर्माण होत आहेत. या स्थित्यंतरातील बऱ्याचशा भावनिक, वैचारिक बाजूंना तिसऱ्या व चौथ्या पिढीतील ग्रामीण कथास्पर्श करत आहे.

तिसऱ्या व चौथ्या पिढीतील बरेचसे ग्रामीण कथाकार खेड्यांत जन्मले व आजही ग्रामीण भागांतच राहतात. खेड्यातील परिवर्तन जवळून, आतून आणि कलात्मक ताटस्थाने बाहेरुनही पाहतात. तिथेच उद्योग-धंदे, व्यवसाय करतात.

Please cite this Article as : *आशालता नारायण खोत*, *१९७५ नंतरची मराठी ग्रामीण कथा* **:**
Golden Research Thoughts (Feb ; 2012)

सामजीवन त्यांच्या जगण्याचा अटळ भाग असतो. ग्रामीण भागातील आर्थिक, सामाजिक, सांस्कृतिक व्यवस्थांशी त्यांचा अनिवार्य संबंध असतो. औद्योगिकरण आणि सरकारीधोरणे यामुळे झपाट्याने बदलणारा ग्रामीण परिसर अशा प्रकारे बघितल्यामुळे परिवर्तनामागील गतिनियम त्यांना माहित होतात. ते त्यांना निर्मितीची ऊर्जा पुरवतात आणि त्यांच्या कथा दमदार होतात.

ग्रामीण कथेने कथेच्या मुख्य प्रवाहांशी नाते ठेवणे आवश्यक आहे. पण ते ठेवत असताना मध्यमवर्गीय कथेतील चुकीच्या आदर्शांचे अनुकरण नव्या ग्रामीण कथाकारांनी टाळले पाहिजे. सुक्ष्मतेच्या मागे जाताना ग्रामीण लेखकांच्या कथा व्यक्तिकेंद्री बनल्या आणि परिसरापासून तुटल्या तर त्या 'ग्रामीण कथा' राहणार नाहीत. व्यक्तिविशिष्टता आणि सामाजिकता यांचा समतोल साधण्याचे अवघड काम आजच्या ग्रामीण लेखकांना एकत्र आणले, प्रोत्साहन दिले.

ग्रामीण कथा आरंभीच्या खोट्या, रोमँटिक वातावरणातून बाजेर पडली. किस्सेवजा होण्याचा मोह तिने टाळला. तात्कालिक मोहांना बळी पडून प्रचारकी किंवा अतिरेकी होण्याचे तिने टाळले.

संदर्भ साहित्य :

१)साहित्य : ग्रामीण आणि दलित (डॉ. मदन कुलकर्णी गौरवग्रंथ)
संपादक : डॉ. ईश्वर नंदपुरे
सहसंपादक : प्रा. क्रिश्चंद्र निघोट, डॉ. राजेंद्र वाटाणे, डॉ. रमा लांबट
विजय प्रकाशन, नागपूर, पहिली आवृत्ती ५ सप्टेंबर २००२.

२)मराठी कथेची स्थितीगती - ड्ॉ. अंजली सोमण
प्रतिमा प्रकाशन, पुणे, प्रथमावृत्ती : १९९५

३)मराठी ग्रामीण साहित्य : परिसर आणि प्रवाह- गो.म. कुलकर्णी
मेहता पब्लिशिंग हाऊस, पुणे प्रथमावृत्ती, जाने १९९९

४)ग्रामीण साहित्य : एक चिंतन- द.ता. भोसले.
मेहता पब्लिशिंग हाऊस, पुणे

Please cite this Article as : *आशालता नारायण खोत , १९७५ नंतरची मराठी ग्रामीण कथा* **:**
Golden Research Thoughts (Feb ; 2012)

Publish Research Article
International Level Multidisciplinary Research Journal
For All Subjects

Dear Sir/Mam,

We invite unpublished Research Paper,Summary of Research Project,Theses,Books and Book Review for publication,you will be pleased to know that our journals are

Associated and Indexed,India

- International Scientific Journal Consortium
- OPEN J-GATE

Associated and Indexed,USA

- EBSCO
- Index Copernicus
- Publication Index
- Academic Journal Database
- Contemporary Research Index
- Academic Paper Databse
- Digital Journals Database
- Current Index to Scholarly Journals
- Elite Scientific Journal Archive
- Directory Of Academic Resources
- Scholar Journal Index
- Recent Science Index
- Scientific Resources Database
- Directory Of Research Journal Indexing

Golden Research Thoughts
258/34 Raviwar Peth Solapur-413005,Maharashtra
Contact-9595359435
E-Mail-ayisrj@yahoo.in/ayisrj2011@gmail.com
Website : www.aygrt.isrj.net